# वागळे वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


महाराष्ट्र पोलीस

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक नियंत्रण अधिसूचना/ ९९ /२०२५ दि.१६/०५/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, वागळे** वाहतूक उपविभागाचे हद्दीत कॅडबरी मेट्रो स्टेशन या ठिकाणी उभारण्यात आलेल्या मेट्रो स्टेशनवर दिनांक १६/०५/२०२५ रोजी ते दिनांक २५/०५/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा ते सकाळी ०५:०० वा. पावेतो रुफ ( मेट्रो स्टेशनचे छत) उभारण्यासाठी कॉमल उभे करुन त्यावर जॅक बिम टाकण्यात येणार असुन त्यानंतर जॅक बिमवर राफ्टर उभारण्यात येणार आहे. सदरचे काम हे ६० टनी मोबाईल क्रेनच्या सहाय्याने करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर क्रेन ही मुंबई नाशिक वाहीनीवर कॅडबरी उड्डाण पुलावर उभी करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मुबंईकडुन नितिन ओव्हर ब्रिज वरून नाशिककडे–घोडबंदरकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **नितिन ब्रिज चढणीचे सुरूवातीला दुभाजक जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरचे मार्गावरील सर्व प्रकारची वाहने ही नितिन ब्रित चढणीच्या सुरूवातीच्या दुभाजक येथून स्लीप रोडने नितिन जंक्शन – कॅडबरी जंक्शन येथुन स्लीप रोडने पुढे कापुरबावडी वरून इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दिनांक १६/०५/२०२५ रोजी ते दिनांक २५/०५/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा ते सकाळी ०५:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

CamScanner

प्रत :- समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/- सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :- संबधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/- म.न.पा.ठाणे च्या संबधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner